# आनंद सागर

प्रथमावृत्ती २२-८-९२

कवियत्री - श्रीमती आशालता वेलणकर

प्रकाशक - श्री. प्रबोध वेलणकर

किमत - २-५० रु.

# ❁ अनुक्रमणिका ❁


| | | |
|---|---|---|
| १) | शंकर पूजन | १ |
| २) | गौरी भिल्लीण | २ |
| ३) | बुक्का पद | ३ |
| ४) | सत् समागम | ३ |
| ५) | गोड नाम | ४ |
| ६) | कृष्ण कृपा | ४ |
| ७) | एकटी ? | ५ |
| ८) | वासुदेव दर्शन | ५ |
| ९) | कोणतेही नाम | ६ |
| १०) | रामकृष्ण हरी | ६ |
| | भजन | ६ |
| ११) | देवाचे नवलाव | ७ |
| १२) | तूच तूच तू | ८ |
| १३) | खरी तृप्ती | ८ |
| १४) | घ्यावे आणि द्यावे | ९ |
| १५) | महामंत्र | ९ |
| १६) | भागवत धर्म | १० |
| १७) | संसार कसा ? | १० |
| १८) | संदेश | ११ |
| १९) | श्रीराम | ११ |
| २०) | हरी नाम | १२ |
| २१) | दृष्टी साफ करू | १२ |
| २२) | नाम महिमा | १३ |
| २३) | जोवरी देहबुद्धी | १३ |
| २४) | मायेची करामत | १४ |

२५) गोपीची तक्रार १५
२६) काय घ्यावे ? १५
२७) गोपालाची आळवणी १६
२८) संदेश १७
२९) हरी ॐ ऽऽऽ ! १७
३०) पिसाट मन १८
३१) खरा भक्त १८
३२) खरे तारू १९
३३) खरी प्रचिती १९
३४) आनंद साऊली १९
३५) वाचे नाम मंगल २०
३६) आस २०
३७) प्रभू तारी मला २१
३८) गणेश वंदन २१
३९) कान्हा वचन २२
४०) नाम गाऊ या २२
४१) अंतरी शोध २३
४२) संग सोड २३
४३) सांब सदाशिव २४
४४) प्रेम बंधन २४
४५) कसे जाणू ? २५
४६) माझा सखा २५
४७) खरी आपदा २६
४८) नाम औषधी २६
४९) भगवंत कसा ? २७
५०) गोपीकांची धांदल २८

" आमच्यावर सुंदर संस्कार

लेणी घातली त्या

परमपूज्य

मातोश्रीस

अर्पण "

# मनोगत

प्रभूकृपेने आनंद संजीवनी व आनंद सरिता यांचे जनता जनार्दनाने स्वागत केले. म्हणून आता आनंद सागर तोच निर्माण करतोय. आनंद सांगरात डुंबू या. ही अल्पशी कृती सद्‌गुरु देवांना अर्पण !

**कु. आशालता वेलणकर**

# १

# शंकर पूजन

बेल वाहू या शिवाला । बेल वाहू या ॥धृ॥

पूर्ण ब्रह्म हरि जाणुनी राहे
कैलासा गिरी
अकी नग तनया । शिवाला बेल वाहू या ॥१॥

भस्म भूषित केली काया
आवरली माया
नमू या त्या पाया । शिवाला बेल वाहू या ॥२॥

शिवहर शंकर गजर होतसे
शिवगणा भितरी
जाऊ शिवालया । शिवाला बेल वाहू या ॥३॥

आद्य गुरु जो शंकर त्याचे
आशा ध्यान करी
अज्ञान घालवू या । शिवाला बेल वाहू या ॥४॥

# २
# गौरी भिल्लीण

शिव हर शंकर गजरी गजरी
नाचत भिल्लीण गौरी
गौरीऽऽऽऽ नाचत भिल्लीण गौरी ॥ध्रु॥

पायी नुपूर फुले मस्तकी
हाती गजरे आली नर्तकी
भाव मनीचे दावी कौतुकी
नाच नाचुनी शिवमन जिंकी ऽऽ। शिवहर शंकर ॥१॥

भिल्लीण गौरी ठुमकत ठुमकत
पद लालित्ये नाद निनादित
सहजचि शिवमन केले अंकीत
रमले जे होते ध्यान समाधित ऽऽ। शिवहर शंकर ॥२॥

आसन सोडीत शंकर वदती
नको मला ती सती पार्वती
चल ये करू या नृत्य सांगाती
भुलूनी भिल्लीणीस आलिंगाती ऽऽ। शिवहर शंकर ॥३॥

शंकर गौरी नव्हे भेट ती
शिव नी जीव एकचि होती
गुरु कृपेने यावी प्रचिती
आशेचि खरी हीच विश्रांती ऽऽ। शिवहर शंकर ॥४॥

## ३

# बुक्का पद

बुक्का म्हणी वाहू या सद्‌गुरु पदा ऽऽऽ
　　बोधामृत पाजुनिया हरिती आपदाऽऽ ॥ध्रु॥
नमन करुनी त्या चरणा
बोध आणू आचरणा
देहबुद्धी खोटी असे । करु ही घोषणाऽऽ ॥१॥
बुक्का लावू ललाटी
चुकवू सकल आटाआटी
मुक्त होऊ कमल जसे ॥ पंकी राहीनाऽऽ ॥२॥
बुक्का ध्वज समतेचा
शांतीचा सौख्याचा
आशा म्हणे दावू जना । मार्ग भक्तीचाऽऽ ॥३॥

## ४

# सत समागम

दृश्य जग सारे जरी नाशवंत
　　हालवी चालवी त्यासी तोचि भगवंत ॥
पाहू जाता त्यासी सहजी ना दिसे
　　ज्यासी दिसे त्यासी लागतसे पिसे ॥
विषयांच्या नादे सकला न दिसे
　　विरागी नी प्रेमियांच्या हृदयी वसे ॥
आशा म्हणे संत समागम करु
　　अविवेक सारु दृष्टी साफ करु ॥

५

# गोड नाम

नाम प्रभूचे गोड घे रे मना नाम प्रभूचे गोड ॥ध्रु॥

भक्ती पंथाने जाता निशिदिनी
मिळेल हरिची जोड ॥१॥

पथ्य एकचि पाळ सख्या तू
निंद्य अवघे सोड ॥२॥

वेद वंद्य जे कर्म करी तू
विषयासक्ती तोड ॥३॥

श्रीहरि येऊनी सहज पुरवितो
आशा मनीचे कोड ॥४॥

६

# कृष्ण कृपा

गगनी उगवतो सविता नेमेसी
नमन तयासी करवेना ॥१॥

करवेना काही नित्य नेम पाही
इंद्रिये ती दाही विषयीरत्त ॥२॥

विषयीरत इंद्रिया सावराया नाम
घेता शम दम हाती येई ॥३॥

आशा म्हणे कृष्ण कृष्ण मुखे म्हणता
नासेल भवव्यथा कृष्ण कृपे ॥४॥

## ७

# एकटी ?

नव्हते मी एकटी कधीही, नसते मी एकटी ॥धृ॥

दुःख कोणते सुख कोणते
मिथ्या ना शेवटी ॥१॥

होणार होते जाणार जाते
कशास आटाआटी ॥२॥

सदैव पाहीन तुज जगज्जेठी
पडिले जरी संकटी ॥३॥

आशा म्हणे मज ईशकृपेने
गुरु माऊली भेटी ॥४॥

## ८

# वासुदेव दर्शन

चतुर्भुज रूप साजिरे लहान
माता पितयाचे हरपले भान ॥धृ॥

उजळले गृह अंतर बाहेर
सगुण ते रूप कांती मनोहर ॥१॥

पितांबरावरी मेखला सुंदर
किरीट कुंडले तेज मुखावर ॥२॥

शंखचक्र गदा पद्म शोभे करी
पुरुषोत्तम रूप वसुदेव अवधारी ॥३॥

आशा म्हणे होता कृपा मजवरी
सद्‌गुरु माऊली करांगुली धरी ॥४॥

## ९

## कोणतेही नाम

श्रीहरि श्रीहरि नित्य वाचेवरी
तयाच्या संसारी काय उणे ? ॥१॥
सांब सदाशिव बोलताच जीव
आनंदाचे पेव ठायी ठायी ॥२॥
दत्त जगद्‌गुरु करिता उच्चार
दिसे विश्वंभर अवती भवती ॥३॥
केशव माधव गोविंद मुकुंद
आनंदाचा कंद हाती असे ॥४॥
आशा म्हणे वाचे नित्य घ्यावे नाम
हृदयी आत्माराम प्रगटेल ॥५॥

## १०

## रामकृष्ण हरी

जप रे मना तू रामकृष्ण हरी
रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी ॥ध्रु॥
सुलभ उपाय हा अति सौख्यकारी ॥१॥
जीवनाचा नाश असता विकारी ॥२॥
रामबाण औषध बहुगुण कारी ॥३॥
नको उद्विग्नता असता संसारी ॥४॥
संकटात आशेला गुरुकृपा तारी ॥५॥

## भजन

सद्‌गुरुनाथ माझे आई मजला ठाव द्यावा पायी
आळंदीचे ज्ञानाई
देहुगावचे तुकाई
पंढरीचे नामाई
सज्जनगडचे समर्थाई
इंदूरच्या जिजीआई

# ११
# देवाचे नवलाव

पहा कसा तो । देव नाना नवलाव करितो ॥धृ॥

सूर्य चंद्र नक्षत्रे गगनी
सप्त द्वीपवती झाली अवनी
मायेकरवी सर्वही करुनी
अलग सदा रहातो ॥१॥

जलधीचे जल खारट असता
मधुर होई गगनी जाता
अवनी वरती सिंचन करिता
मनी मोद होतो ॥२॥

बीज सानुले वक्षृ महान
फुला-फळांनी सुखवी जीवन
तटस्थ वृत्ती योगी महान
मानवास शिकवितो ॥ ३ ॥

देहाऐसे यंत्र बनवितो
साधन करवुनी साध्य साधितो
आशा म्हणे मग शांती देतो
अनुभवा येतो ॥४॥

## १२

# तूच तूच तू

स्वयंप्रकाश तूच देवा परात्पर तू
तूच शुद्ध रूप जगी तूच बुद्ध तू ॥
तूच हृदयी वसतोसी लपत छपत तू
तूच प्रगट होशी तसा गुप्त होशी तू ॥
तूच ज्ञान देशी कर्म करवितोस तू
तूच विषय निर्मितोसी निर्विषय त ॥
तूच चल अचल तूच भेद रहित तू
तुझ्या सम तूच देवा अद्वितीय तू ॥
तूच गुरु माय बनुनी जगी येशी तू
आशा करी वंदन परी ती ही तूच तू ॥

## १३

# खरी तृप्ती

आला आला आला आला बन्सरीवाला बन्सरीवाला
आला आला आला आला नंदलाला नंदलाला ॥१॥
गेला गेला गेला गेला संशय गेला सशय गेला
झाला झाला झाला झाला निश्चय झाला पक्का झाला ॥२॥
मेला मेला मेला मेला अहंकार मेला अहंकार मेला
पेला पेला शांती पेला हाती आला हाती आला ॥३॥
गेला गेला गेला गेला देहभाव गेला देहभाव गेला
झाला झाला झाला झाला देवभाव झाला देवभाव झाला ॥४॥
माऊलीचा वरदहस्त माथी आला माथी आला
आशा म्हणे जीव माझा तृप्त झाला तृप्त झाला ॥५॥

# १४

# घ्यावे आणि द्यावे

संत नित गाती देवाचे पोवाडे
उघडी कवाडे हृदयीची ॥१॥
हृदयी अमृत साठविले गोड
घेती त्यासी देती सदोदित ॥२॥
घ्यावे आणि द्यावे हाचि नित्य नेम
नाम हा विश्राम जीवनाचा ॥३॥
आशा म्हणे नाम गुरुकृपे स्मरू
अविवेक सारू दृष्टी साफ करू ॥४॥

# १५

# महामंत्र

श्रीराम जयराम जय जय राम
जय जय राम
श्रीराम जयराम जय जय राम ॥ध्रु॥
महामंत्र हा सिद्ध मंत्र
भेटवी आत्माराम ॥१॥
घडा पापाचा धुतला जातो
घालुनी पूर्ण लगाम ॥२॥
नाम घालवी द्वैत मनातील
एकचि राम नी शाम ॥३॥
आशा म्हणे गुरुवचनी श्रद्धा
करीतसे पूर्ण काम ॥४॥

## १६

# भागवत धर्म

सोडवू या सोडव या माया कोडे सोडवू या
जोडू या जोडू या आनुसंधाना जोडू या
साठवू या साठवू या विचारधन साठवू या
आठवू या आठवू या संतवचन आठवू या
हटवू या हटवू या मत्सर भाव हटवू या
वाढवू या वाढवू या बंधूभाव वाढवू या
आशा म्हणे जागवू या भागवत धर्म जागवू या

## १७

# संसार कसा ?

दुःखमय हा संसार, मना रे
दुःखमय हा संसार
त्यातच पाहती सुखचि केवळ
परी उलटे फळ पडे हातावर ॥ ध्रु॥
सुख ना कोठे या जगतावर
म्हणुनी जडू दे प्रीती नामावर ॥१॥
केले कर्म ते भोगणे प्राप्त
सहाय्य न करिती गणगोत आप्त ॥२॥
विचार करुनी सारासार
घेई प्रचिती हो तदाकार ॥३॥
आशा विनवी बोध घे जरा
गुरु कृपेचा खरा आसरा ॥४॥

## १८

# संदेश

सापडला ग सापडला जो हरवला वाटे
धरू जाता हाती न येतो वचन ना खोटे
नाम घेता शुद्ध होते बुद्धी आणि मन
हीच कसोटी खरी भक्ताची पाहे भगवान
चकवा चकवी खेळ कुणाचा ओळखावी माया
खऱ्या स्वरूपा विसरुनी जीव अंतरला पाया
रीत जगाची पुढेच जावे मागे कशाला वळा
संत सांगती जाणीव होणे हाच प्रभू कळवळा
पदोपदी त्या प्रभूची लीला पहा अवती भवती
दाखवितो रूप पाहुनी आशा होते पुलकित चित्ती
संदेश – **साधना हीच खरी संपदा**

## १९

# श्रीराम

श्रीराम जयराम जय जय राम
जय जय राम
श्रीराम जयराम जय जय राम ॥ध्रु॥
नाम अखंडीत देई दाम ।१।
भक्त खरा तोचि जिंकी काम ॥२॥
प्रिय प्रभूला जो गाळीतो घाम ॥३॥
असो भक्तीचा निश्चय ठाम ॥४॥
सदैव गावे प्रभूचे नाम ॥५॥
अंतर पारखी पाही धाम ॥६॥
राम खरा जिवीचा आराम ॥७॥
श्रीराम विश्वाचा विश्राम ॥८॥
अंकीत भक्तीचा हो राम ॥९॥
आशा वांछिते प्रभूचे धाम ॥ १० ॥

## २०

# हरी नाम

हरि नाम जप तू सदा
मना रे, प्रभू नाम जप तू सदा ।।ध्रु।।
सुप्रभाती स्मरण करावे
दूर होतील आपदा ।।१।।
सदाचार ही नौका जीवनी
त्यागू नको तिज कदा ।।२।।
भगवंताला जो नित ध्यातो
तोचि पावे निजपदा ।।३।।
आशा वदे हा अनुभव घ्याया
शरण जावे गुरुपदा ।।४।।

## २१

# दृष्टी साफ करू

रामकृष्ण वाचे हरिरंगी नाऽऽचे
विषय संग त्याचे सुटतील ।।ध्रु।।
मनाचा निर्धार बुद्धी धारदार
नामाचा गजर अखंडित ।।१।।
अखंडित चित्त चिंतनाचे ठायी
सुख त्याचे पायी लोळू लागे ।।२।।
भागीरथी वरू आशेला आधारू
अविवेक सारू दृष्टी साफ करू ।।३।।

# २२

## नाम महिमा

नाम गावे गोविंदाचे, गोविंदाचे
नाम गावे गोविंदाचे
मन मोर मोदे नाचे ॥ध्रु॥
नाम रुप अरुपाचे, अरुपाचे
दर्शन होते श्री शिवाचे ॥१॥
नाम चिन्ह अनामाचे, अनामाचे
तुटे बंधन हो जीवाचे ॥२॥
नाम पेव आनंदाचे, आनंदाचे
हेचि सार जीवनाचे ॥३॥
नाम फळ साधनेचे, साधनेचे
नाम तारु हे आशेचे ॥४॥

# २३

## जोवरी देहबुद्धी

जोवरी देहबुद्धी रे
तोवरी विफल सारे रे ॥ध्रु॥
संत संगती न घडे मना
क्षीण न होती वासना ॥१॥
विवेक न जागा मनी झाला
ब्रह्मपदाला तो मुकला ॥२॥
मन न होई तदाकार
आशा इच्छीते सद्‌गुरूवर ॥३॥

## २४
# मायेची करामत

विश्वाचा विश्वात्मा श्रीहरि
डावलून त्याला दुरी ।
अशी ही माया करामत करी ॥ध्रु॥

आकाश निळे सागर निळा
कोण असे रंगारी । अशी ही माया......॥१॥

ढगात दिसतो राक्षस जैसा
तशीच नारी सुंदरी । अशी ही माया......॥२॥

खळखळ ओढा वहात असतो
फेसाळ दुधापरी । अशी ही माया......॥३॥

दुरून डोंगर दिसे साजिरा
वृक्षराजी अंगावरी । अशी ही माया......॥४॥

असते एक भासते दुजे
कोण असे चितारी । अशी ही माया......॥५।

सद्गुरु कृपे आशा विसावली
आनंद झुल्यावरी । अशी ही माया...... ॥६।

## २५

# गोपींची तक्रार

सखे ग हरि खोड्या करी अनिवार ॥ध्रु॥

लावी कलामती खटनट श्रीपती
त्वरित होई पसार ॥१॥

हंडी दह्याची फोडिली याने
मजवरी होई स्वार ॥२॥

वाढीत होते पतीला मी माऱ्या
खारट केले सार ॥३॥

हिंदोळयावर बसले मी होते
भाळ करी लालेलाल ॥४॥

इकडची दाढी माझी वेणी
बांधून करी बेजार ॥५॥

न्हाणी घरात मी गेले स्नाना
बाहेरून लावी दार ॥६॥

आशा म्हणे अशी हरिची लीला
गावी अपरंपार ॥७॥

## २६

# काय घ्यावे ?

नाम गावे नाम घ्यावे
नामे पदी लीन व्हावे ॥ध्रु॥

नाम उरफाटी गंगा
पावन करी अंगप्रत्यंगा ॥१॥

चित्त नामी असता सार्थ
नाहीतरी होय व्यर्थ ॥२॥

नाम हेचि गुरु किल्ली
द्वैत कपाटे उघडली ॥३॥

आशा म्हणे सद्गुरु माय
खुष असता उणे काय ॥४॥

# २७

# गोपालाची आळवणी

तुज आळवू किती मी गोपाला
        मधु वाजवी ना रे मुरलीला ॥ध्रु॥

ठावे मजला गोकुळ लीला
वाजवुनी तव मधु मुरलीला
भुलविलेस तू गोपीबाला । कुंजवनी बघ त्या रमल्या ॥१॥

वाटे मजला पेंद्या व्हावे
काठी कांबळी घेऊन यावे
धेनूसवे मग वनी विचरावे । पाहीन नित मी चरणाला ॥२॥

वृक्ष बनोनी छाया देईन
कांबळी बनुनी खांदी राहीन
माला होऊनी तुज शोभवीन । परी दावीरे पदकमला ॥३॥

जीव विहग हा तनुपंजरी या
निशीदिनी धडपड करी सुटाया
कण कण आयु जाई वाया । देई शांती आशेला ॥४॥

# २८

# संदेश

सकीर्तन श्रीकृष्णाचे मिळे समाधान
शक्ती बुद्धी आपुल्या ठायीची वाढवी भगवान ।।
यत्न करिता हाती येते धन हे मोलाचे
सज्जन संगती याच कारणा वचन वेदाचे ।।
'वं' चे आधी ग हे अक्षर असता जो शद्ब
नाश दावितो म्हणुनी साधना व्हावी नि:शद्ब ।।
शास्त्राधारे वर्तन असता नको भयाची वार्ता
समाधान ही परम सपदा अखंड ये हाता ।।
काम वासना क्षीण करण्या नाम साधना हवी
रमता रमता सहज समाधी नित्य साधावी ।।
'णी' ने पूर्तता येते 'स्मर' ला म्हणती तिज स्मरणी
भूमा देवा जवळीक होण्या यत्न व्हावा झणी
तर्क मनाचे लटिके ठरती हवे शुद्ध ज्ञान
अनुभव येतो आनंदाने तल्लीन होय मन ।।
सगुण भक्ती वाढवी शक्ती होते विश्वमन
तोच हेतु आशा मनीचा पुरवितो भगवान ।।
सदेश – **संशय सर्व नाशास कारणीभूत असतो.**

# २९

# हरि ॐ ऽऽऽ !

हरि ॐ हरि ॐ हरि ॐ गुंजन
मनास भेटवी सतत निरंजन ।।हरि ॐ।। ।।ध्रु।।
साधने असती बहुतापरी
ॐ साधनेस नये सरी हरि ॐ ।।१।।
ॐ काराचे चिंतन सतत
नेई सुखदु:खाचे अतीत हरि ॐ ।।२।।
आशा म्हणे ॐकार साधन
हेचि नयनीचे दिव्य अंजन हरि ॐ ।३।।

## ३०

# पिसाट मन

भजनी तुझ्या रमावे । त्वन्नाम घेत जावे
मुळी स्थीर का न व्हावे । मन हे पिसाट माझे ।।१।।
जाईन मंदिरात । पाहीन लक्ष्मीकांत
सबबी का आड येते । मन हे पिसाट माझे ।।२।।
येता कुणी अपंग । द्यावे तयास काही
वाटे अस्थानी गेले । मन हे पिसाट माझे ।।३।।
सत्कर्म नको वाटे । दुष्कर्म करी नेटे
प्रपंची त्वरीत चिकटे । मन हे पिसाट माझे ।।४।।
सत्संग वाटे बुरा । विवेकास ना दे थारा
व्यसनात गुंग सारा । मन हे पिसाट माझे ।।५।।
आशा म्हणे मनाला । लावू गुरु सेवेला
तोटा ना आनंदाला । मन ना पिसाट माझे ।।६।।

## ३१

# खरा भक्त

भक्ती भक्त भगवान । एक रूप झाले ध्यान
पाही जगी देव फक्त । तोचि खरा भक्त ।।
कुणी निंदा कुणी वंदा । भेदभाव नाही कदा
अति शांत विरक्त । तोचि खरा भक्त ।।
क्षमाशील दयाशील । धर्मशील पुण्यशील
सदा विवेक उदात्त । तोचि खरा भक्त ।।
आशा म्हणे कर्तव्याची । चाडमनी स्वधर्माची
सळसळते ज्याचे रक्त । तोचि खरा भक्त ।।

## ३२

## खरे तारू

नाम हेचि तारू रे । नेईल पैर पारू रे
शांत होईल एका क्षणी । संशयाचा वारू रे ।।१।।
म्हणती संसार तारू रे । अतिशय हा दुस्तरू रे
प्रभू नामाची सांगड । बांधूनी सहज तरू रे ।।२।।
आळस वैरी मारू रे । खडे तयासी चारू रे ।
आशा म्हणे तोडूनी टाकू । बंधाचा दोरू रे ।।३।।

## ३३

## खरी प्रचिती

मी माझे म्हणुनी आयुष्य घालविले
हाती ना पडले फळ मूळ ।।१।।
आपुले काही नाही कोणाचे वैभव ?
घेई अनुभव गुरु कृपे ।।२।।
कृपा सद्गुरुची संमती ईशाची
भेद ना, ऐक्याची प्रचिती पाही ।।३।।
सद्गुरु माऊली आशेला आधारू
अविवेक सारू दृष्टी साफ करू ।।४।।

## ३४

## आनंद साऊली

संतांनी थाटला नामाचा बाजार
नाम घरोघर पैस झाले ।।ध्रु।।
संत एक जाणा नाम जंगी पेठ
नाम नेई थेट वैकुंठासी ।।१।।
नामानंदे नाचे आनंदाचा कंद
नामे श्री गोविंद स्वये व्हावे ।।२।।
नामाने लाभली आनंद साऊली
आशा स्थिरावली गुरुपदी ।।३।।

## ३५

# वाचे नाम मंगल

गाऊ नाचू आणि वदू या
वाचे नाम मंगल ॥ध्रु॥
संसारी या बसती चटके
येता जाता खावे फटके
लोभ नी मोह वाढवित खटके
साधू घडी ही मंगल ॥१॥
संत सांगती बाह्या उभारूनी
सरळ नी सोपा मार्ग असूनी
कशास फिरता रानी वनी
नाम गावे मंगल ॥२॥
सुख दुःखाचे मूळ शोधिता
कशास कसला नाही पत्ता
आशा म्हणे प्रभू गीत गाता
येई प्रचिती मंगल ॥३॥

## ३६

# आस

आस असे एकचि या जीवा
पाहीन तुज माधवा, तुला माधवा, तुला माधवा ॥ध्रु॥
आशा नैराश्येचे तारे । मायचे अन् धागे दोरे
भुलविती मानवा तरी मी । पाहीन तुज माधवा (३ वेळा) ॥१॥
भ्रांतीचे हे कडे कपारे । वाटती जगता दुस्तर सारे
नष्ट करीन त्याजला आजला । गाईन तुज माधवा (३ वेळा) ॥२॥
सुख दुःखाच्या बुद्बुद् लहरी
भवसागरी या असती कितीतरी
क्षण भंगूर मानूनी त्याजला । पूजीत तूज माधवा (३ वेळा) ॥३॥
मी माझेचे अफाट वारे
फिरविती मज चक्राकारे
आशा मनी निश्चय जाहला । ध्याईन तुज माधवा (३ वेळा)॥४॥

## ३७

# प्रभू तारी मला

प्रभू तारी मला सदयाऽऽ । चरणी लीन काऽऽया ।।ध्रु।।
नाही राग ज्ञान । नसे ताल सूर
कंठ ना सुस्वर । तरी ध्यातसे मी पाऽऽऽया ।।१।।
माया मोह सारे । मांडिती पसारे
येऊनिया त्वरे । अजि सोडवी मज राऽऽऽया ।।२।।
तनूवेलीवरी । हृदय मोगरी ।
वाहे चरणावरी । तू अंगिकारी राऽऽय्या ।।३।।
चंचल हे मन । धावे जणू मीन
तूच शांतिस्थान । आशा लीन पाऽऽऽ या ।।४।।

## ३८

# गणेश वंदन

नमू या प्रेमे गणरायाला सकल मिळुनी अजि हो
आपण सकल मिळुनी आजि हो ।।ध्रु।।
दुर्गुण त्यजुनी सद्‌भावाने । स्मरू देवराया । आपण ।।१।।
भाव मनीचे जुडीदुर्वांची । वाहू गणेशाला । आपण ।।२।।
कर्पूर गर्वा जाळुनिया । प्रेमे ओवाळूया । आपण ।।२।।
प्रभू कार्यास्तव देह झिजवूया। संघटित होऊ या। आपण ।।४।।
प्रार्थिते आशा श्री गणेशा । तन मन अर्पू या । आपण ।।५।।

## ३९

## कान्हा वचन

यशोदे काय सांगू तुजला
कान्हा वदतो गे मजला ॥धृ॥

मीच जगाचा असुनी पिता
कशा ग म्हणता मज लाला ? ॥१॥

शशी रवी गगनी माझी सत्ता
कशाला भिऊ काळोखाला ? ॥२॥

विष अमृत सहज पचवितो
कशाला देता गुटीकेला ? ॥३॥

बाल कन्हैय्या मनात ठसता
कशाला भय हो आशेला ? ॥४॥

## ४०

## नाम गाऊ या

श्रीरामाचे जयरामाचे जय जय रामाचे
नाम गाऊ या नाम घेऊ या श्री रामाचे
श्रीकृष्णाचे जय कृष्णाचे जय जय कृष्णाचे
नाम घेऊ या नाम घेऊ या श्रीकृष्णाचे ॥धृ॥

नाम घेता नित्य वाचे दोष नुरतील
संशय मनीचे पाळामुळासह पार जातील ॥१॥

भवसागर हा पार करण्या नाम हेचि तारू
निश्चय वल्हे हाती घेवोनी जाऊ पलपारू ॥२

अनुसंधाने अखंड आचरू आपुला स्वधर्म
संत सांगती परमार्थाचे हेचि खरे वर्म ॥३॥

आशा अनुभवी नित्य तृप्तता हीच गुरुकृपा
काकण करीचे जसे पहातो पाहू निजरुपा ॥४॥

## ४१

# अंतरी शोध

कशास फिरशी दारोदारी
रे मना शोध घे अंतरी ॥धृ॥
व्रते केली दाने दिधली । अभिमानाने बुद्धी फुल्ली ॥
तीर्थ स्नाने शते गणती । शुद्ध झाली का रे मती ॥२॥
कोटी नी कोटी जप केला । शांती मिळाली का रे तुला ॥३॥
नाम घेता वरचेवरी । दोष नुरतील तीळभरी ॥४॥
कोण तू खरा जाण रे पुरा
गुरु कृपा ही आशेस आसरा ॥५॥

## ४२

# संग सोड

सोड सोड सोड मना, त्वरित संग सोड
अविरत तू राही मना नामातचि दंग ॥धृ॥
क्रोधाला प्रीय सखा मानितोसी ना ?
जनक तोचि खेदाचा सत्य रे मना ॥१॥
काम बहूरुपी प्रिय वाटतो तुला
बनवुनी तुज विकारी करी नाशाला ॥२॥
काम क्रोध उभयांचा साथी मत्सर
दंभ अंगी वाढवुनी करी बेजार ॥३॥
ऐक संत वचन मना साधी हिताला
पारखुनी दूर करी लोभ मोहाला ॥४॥
आशेला विश्वास वाटतो मनी
मन ज्याचे शुद्ध तोचि मान्य त्रिभुवनी ॥५॥

## ४३

# सांब सदाशिव

वद वद वद जिव्हे सांब सदाशिव
नासेल भवभय ईशकृपे ॥धृ॥
रामनाम आवडी जेणे भजियेले
तयासी पुजीले पार्वतीने ॥१॥
पचवुनी विष तारियेले विश्व
दृढ मनी भाव वैराग्याचा ॥२॥
संसार दुःखाचा परमार्थ सुखाचा
तोल हा मनाचा जाऊ नेदी ॥३॥
दैवाचा हा खेळ पाहीन सुखाने
आशा भजनाने पुलकित ॥४॥

## ४४

# प्रेम बंधन

विठू माझा चांगला प्रेमे त्यासी बांधला
भक्ताचिया कार्जासाठी धावुनिया आला ॥धृ॥
भक्तीचिया वेलीवर दृढ श्रद्धा फूल
मन फुलपाखरू बसे त्याच्यावर
सत्संगाचा वारा येतो शांती लाभे चित्ताला
विठू माझा............॥१॥
शांतिपोटी समाधान हेचि सज्जनाचे धन
हरिनामी दंग मन हेचि विषय सेवन
आनंदाचा साठा महा मिळे हरि भक्ताला
विठू माझा............ ॥२॥
हरिभक्त सदोदित नाम वाचे उच्चारित
पांडुरंगी दृढ चित्त ध्यान त्याचे हृदयांत
नित्य सद्गुरुकृपेने आशा तत्पर सेवेला
विठू माझा............ ॥३॥

## ४५
# कसे जाणू ?

कसे तर्काने जाणू मी तुला
रे वसुदेव देवकीच्या मुला ? ॥१॥
कसे शद्वाने जाणू मी तुला
रे नंद यशोदेच्या मुला ? ॥२॥
कसे कल्पनेने कल्पू मी तुला
रे अखिल जगत दादुला ? ॥३॥
कसे दृष्टीने पाहू मी तुला
रे नयनीच्या नयनातला ? ॥ ४॥
कसे अंतरंगी अनुभवू तुला
प्रभो तू आशिष दे आशेला ॥५॥

## ४६
# माझा सखा

कृष्ण जीविचा सखा हो माझा
कृष्ण जीविचा सखा ॥ध्रु॥
नाम अमृत सेविता नित्य
विसर पडतो दुःखा हो माझा
कृष्ण......॥१॥
मी तू पणाचा भेद घालविता
वाण नाही सुखा हो माझा
कृष्ण...... ॥२॥
सद्‌गुरु कृपे आशा पुलकित
अनुभव येई नि का हो माझा
कृष्ण......॥३॥

## ४७

# खरी आपदा

संपदा हीच खरी आपदा
मना रे बोध घेई सदा ॥ध्रु॥
पैसा हवासा वाटतो कसा
जीवासी करिता वेडा नी पिसा
भूलू नको तू कदा । संपदा......॥१॥
धन मिळवावे सन्मार्गाने
नको कुणाचे अन्यायाने
पाप नको सर्वदा । संपदा...... ।२॥
अति स्वार्थाने अनर्थ होतो
अर्थचि घाता कारण होतो
सोडू नको नीति कदा । संपदा...... ॥३॥
शद्व रंजित कायदा वायदा
इच्छिल्या परी होई ना सदा
आशा शरण नित गोविंदा । संपदा......॥४॥

## ४८

# नाम औषधी

नाम नव्हे खेळ दिव्य ही औषधी
हरतील व्याधी जन्मांतरीच्या ॥१॥
औषधी समवेत पथ्य नित्य नेम
पाळीता आराम अल्पावधित ॥२॥
शीण न तनूला शांतता चित्ताला
पाहे प्रभू लीला अवती भवती ॥३॥
आशा म्हणे माझा वैद्य हो सद्गुरु
अविवेक सारू दृष्टी साफ करू ॥४॥

# ४९

## भगवंत कसा ?

वर्णू किती गुण अपरंपार । मोद मनाला होई फार ।।ध्रु।।
चिकण माती नीट भिजवुनी
चाकावरती गोळा ठेवुनी
नाना विध आकार देऊनी
पात्रे बनवी अपार । असा हा कुशल असे कुंभार ।।१।।
शेत नांगरूनी भुसभुशीत करुनी
बी बियाने उत्तम पेरुनी
तण शेतातील समूळ काढूनी
पीक घेई सरोभरी । असा हा कुशल शेतकरी ।।२।।
सुवर्ण कसेही असले हीन
किटाळ त्यातील समूळ जाळून
अलंकार खुबसुरत बनवून
खुलवितो शृंगार । असा हा कुशल असे सोनार ।।३।।
कापड अपुले असो कसेही
वेतुनी कपडे शिवून देई
काजी गुंड्या लावुनी त्याही
समयाला ओपी । असा हा कुशल असे शिंपी ।।४।।
गुरु कृपेचा नित आधार
आशा मनी आनंदी फार
म्हणा तयाला शिंपी सोनार
अथवा शेतकरी । असा हा कुशल कारभारी ।।५।।

## ५०

# गोपिकांची धांदल

कुंजवनात ग वनात हरि हा जाई
गोपिकांची ग किती ही घाई ॥ध्रु॥

तिने डोळ्यात ग डोळ्यात कुंकू घातले
आणि कपाळी काजळ फासले ॥१॥

तिने पायात ग पायात वाकी घातली
आणि दंडात साखळी ल्याली ॥२॥

तिने नाकात ग नाकात बाळी घातली
आणि केसात नथ खोविली ॥३॥

तिने शिक्यात ग शिक्यात मूल ठेविले
आणि दहीघट कडे घेतले ॥४॥

लांब कोठेतरी वाजे ग बाई बासरी
कानी येतो ग वृत्ती बावरी ॥५॥

आशा म्हणे चला पाहू ग नंदनंदन
चित्त पदी ग स्थिर ठेवून ॥६॥